# प्रसिध्दी पत्रक

**श्री. संतोष रामचंद्र जेऊरकर, वय ५२ वर्षे, व्यवसाय नौकरी- सांख्कीकी सहायक वर्ग-३, जिल्हा सामान्य रुग्नालय, चिकलठाणा, औरंगाबाद हे ३,०००/- रुपयाची लाच स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | श्री. संतोष रामचंद्र जेऊरकर, वय ५२ वर्षे, व्यवसाय नौकरी- सांख्कीकी सहायक वर्ग-३, जिल्हा सामान्य रुग्नालय, चिकलठाणा, औरंगाबाद, रा. घर नं. ४८, स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, नागेश्वरवाडी, औरंगाबाद. |
| गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक ०९/०७/२०१८ रोजी जिल्हा सामान्य रुग्नालय, चिकलठाणा, औरंगाबाद. |
| लाचेची रक्कम | :- | ३,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांना बॉम्बे नर्सींग अॅक्ट नुसार तक्रारदार यांचे पत्नीच्या नावे पैठण येथे असलेल्या हॉस्पीटलचे नोंदणीचे नुतनीकरणाचे प्रमाणपत्र देण्यासाठी |

यातील तक्रारदार डॉ. मदनलाल चुन्नीलाल मानधने यांची पत्नी डॉ. जयश्री मानधने यांचे नावे पैठण येथे मानधने हॉस्पीटल आहे. सदर हॉस्पीटलचे बॉम्बे नर्सींग अॅक्ट नुसार प्रत्येक तीन वर्षानंतर हॉस्पीटलचे नोंदणीचे नुतनीकरण करणे गरजेचे असते. त्याकरिता तक्रारदार यांनी हॉस्पीटलचे नोंदणीचे नुतनीकरण करण्यासाठी ग्रामीण रुग्नालय, बिडकीन यांचे मार्फतीने जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्नालय, चिकलठाणा, औरंगाबाद येथे रितसर प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने श्री. जेऊरकर, सांख्कीकी सहायक, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्नालय, औरंगाबाद यांनी तक्रारदार यांना १० दिवसापुर्वी फोन केला होता त्यावेळी श्री. जेऊरकर हे तक्रारदार यांना म्हणाले की, तुमच्या हॉस्पीटलचे नुतनीकरणाचे प्रमाणपत्र तयार झाले असून, त्यासाठी शासकीय फिस ३००/- रु व मला ५०००/- रु वरचे द्यावे लागतील, त्याशिवाय प्रमाणपत्र देता येणार नाही, असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी फोन कट केला. त्यानंतर तक्रारदार यांनी अंदाजे चार दिवसांपुर्वी श्री. जेऊरकर यांना फोन करून त्यांचे हॉस्पीटलचे नोंदणीचे नुतनीकरणाचे प्रमाणपत्र तयार झाले का? असे विचारले, त्यावर श्री. जेऊरकर म्हणाले की, तुम्ही दि.०९/०७/२०१८ रोजी वरचे ५०००/- रु आणून द्या व प्रमाणपत्र घेऊन जा असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांची श्री. जेऊरकर, सांख्किकी सहायक, जिल्हा सामान्य रुग्नालय, चिकलठाणा, औरंगाबाद यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने आज दिनांक ०९/०७/२०१८ रोजी श्री. संतोष रामचंद्र जेऊरकर, व्यवसाय नौकरी- सांख्कीकी सहायक, वर्ग-३, जिल्हा सामान्य रुग्नालय, चिकलठाणा, औरंगाबाद यांच्याकडे पंच साक्षीदारा समक्ष लाचेची मागणीची पडताळणी केली असता, श्री. जेऊरकर यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/- रु लाचेची मागणी करून तडजोडी अंती ३०००/- रु लाच स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन आज दि.०९/०७/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजित करण्यात आला असता, श्री. संतोष रामचंद्र जेहुरकर, वय ५२ वर्षे, व्यवसाय नौकरी- सांख्कीकी सहायक वर्ग-३, जिल्हा सामान्य रुग्नालय, चिकलठाणा, औरंगाबाद यांनी पंच साक्षीदारा समक्ष ३,०००/- रुपये लाचेची रक्कम रुम नंबर. ५३, जिल्हा सामान्य रुग्नालय, चिकलठाणा, औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**Mail ID :- dyspacbaurangabad@mahapolice.gov.in**

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, औरंगाबाद — सत्यमेव जयते

(वर्षाराणी पाटील)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.